असा. क्र. ८६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमवीआय/२००२

3614

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, जुलै ९, २००२/आषाढ १८, शके १९२४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ जुलै २००२

### अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक आरटीआर. १०९८/२२२३/(२६५)/दोन.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि त्यासंबंधीचे अस्तित्वात असलेले सर्व नियम, आदेश व अनुदेशाचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या विधि व न्याय विभागातील सहायक (विधि) गट-ब या पदाचे सेवाभरतीचे विनियमन करणारे नियम खालीलप्रमाणे करीत आहे :—

१. या नियमांना विधि व न्याय विभागाच्या विधि शाखेतील सहायक (विधि) गट-ब या पदाचे सेवा (भरती) नियम, २००२ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) "सहायक (विधी)" म्हणजे विधी व न्याय विभागाच्या विधि शाखेतील सहायक ;

(ब) " आयोग " म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(क) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ड) " विधि व न्याय विभाग " म्हणजे महाराष्ट्र शासनाचा विधि व न्याय विभाग ;

(इ) " विधि शाखा " म्हणजे विधि व न्याय विभागाची विधि शाखा (प्रारूप शाखा वगळून) ;

(फ) " अर्हताप्राप्त सहायक (विधि) " म्हणजे विधि व न्याय विभागांच्या अधीक्षक (विधि) या पदावर अर्हताधारक होण्याकरिता सहायक (विधि) साठी शासनाने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण असतील किंवा शासनाने अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल असे विधि व न्याय विभागांच्या विधि शाखेतील सहायक.

३. " सहायक (विधि) " या पदावर नामनिर्देशनाने करावयाची नियुक्ती ही पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून असेल—

(एक) ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त नाही ;

(दोन) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधि शाखेची पदवी धारण केलेली असेल, किंवा शासनाने त्याकरिता घोषित केलेली समतुल्य अर्हता ; आणि

(तीन) संचालक, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी ठरवून दिलेले संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे ;

असे असले तरी, ज्या व्यक्तीने विधि शाखेची मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी अथवा शासनाकडून घोषित केलेल्या कोणत्याही तत्सम अर्हतेस प्राधान्य देण्यात येईल.

४. या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीला जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

५. या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती सहसचिव, विधि व न्याय विभाग, नागपूर व औरंगाबाद या कार्यालयात कोणत्याही वेळी बदली होण्यास पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. रा. वचेरे,
शासनाचे सहसचिव.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 3rd July 2002

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR. 1098/2223(265)-II.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, and in supersession of all rules and amendment issued by Law and Judiciary Department, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the rules regulating the recruitment to the post of Assistant (Legal) Group-B in the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Assistant (Legal), in the Legal Side of the Law and Judiciary Department(Recruitment) Rules, 2002.

2. In these rules, unless the context requires, otherwise,—

*(a)* " Assistant (Legal) " means the Assistant of the Legal Side of the Law and Judiciary Department;

*(b)* " Commission " means the Maharashtra Public Service Commission;

*(c)* " Government " means the Government of Maharashtra;

*(d)* " Law and Judiciary Department " means the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra;

*(e)* " Legal Side " means the Legal Side (excluding drafting section) of the Law and Judiciary Department;

*(f)* " Qualified Assistant (Legal) " means an Assistant on the Legal Side of the Law and Judiciary Department who has passed the Departmental Examination prescribed by the Government for the Assistant (Legal) to become qualified for promotion to the post of Superintendent (Legal) of the Law and Judiciary Department or has been exempted from passing such an examination.

3. Appointment to the post of Assistant (Legal) shall be made by nomination from amongst candidates who,—

(1) are not more than 30 years of age;

(2) possess a degree in Law of a statutory University or any other qualification declared by Government to be equivalent thereto;

(3) possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of information and Technology, Government of Maharashtra, from time to time. Provided that preference will be given to a Masters Degree in Law of a statutory University or any other qualification declared by Government to be equivalent thereto.

4. A person appointed to the post of Assistant (Legal) shall be required to pass the Departmental Examination and Examination in Hindi and Marathi according to the rules made in that behalf unless he has already passed, or has been exempted from passing these examinations.

5. A person appointed to the post of Assistant (Legal) shall be liable at any time to be transferred to the offices of the Joint Secretary, Law and Judiciary Department at Nagpur and Aurangabad.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. R. BACHERE,
Joint Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई